**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १४ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती दौपदी मुर्मू आज संध्याकाळी देशाला संबोधित करणार.**
2. **'हर घर तिरंगा' अभियानाचा सर्वत्र उत्साह, यवतमाळ मध्ये आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या उपस्थितीत भव्य तिरंगा यात्रा.**
3. **देशाची फाळणी आणि भीषण संहाराच्या स्मृतिप्रित्यर्थ देशभरात विभाजन विभिषिका दिवसाचं आयोजन.**
4. **वाहनाला उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट अर्थात एचएसआरपी लावण्यासाठी नागपूर शहरात 114 केंद्र सुरु.**

**आता सविस्तर बातम्या .......**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

देशाचा ७९वा स्वातंत्र्यदिन उद्या साजरा होत आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासियांना संबोधित करणार आहेत. सायंकाळी सात वाजता त्यांचा हा संदेश आकाशवाणी तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होईल. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर एक हजार ९० पोलीस, अग्निशमन कर्मचारी, होमगार्ड आणि नागरी संरक्षण तसंच सुधारात्मक सेवेतल्या कर्मचाऱ्यांना सेवा आणि शौर्य पदकं जाहिर झाली आहेत. राज्यातल्या सात पोलीस कर्मचाऱ्यांना आणि तीन अग्निशमन कर्मचाऱ्यांना शौर्य पदक जाहिर झालं आहे. पोलीस कॉन्स्टेबल सुरेश तेलामी यांना मरणोत्तर शौर्य पदकाने गौरवण्यात येणार आहे. उत्कृष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक राज्यातल्या तीन पोलीस अधिकार्यांना जाहिर झालं आहे. तर गुणवत्तापूर्ण सेवा पदक मिळालेल्यां मध्ये २१ पोलीस, पाच अग्निशमन, पाच होमगार्ड आणि नागरी संरक्षण, तर आठ सुधारात्मक सेवेतल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

स्वातंत्र्यदिन-मुख्य सोहळा

स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करतील, आणि प्रथेनुसार राष्ट्राला संबोधित करतील. लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमात सन्माननीय अतिथी म्हणून यावर्षी देशभरातल्या २१० सरपंचांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये महिला सरपंचांचा लक्षणीय सहभाग आहे. या सरपंचांनी आपल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास व्हावा यासाठी विशेष प्रयत्न केले असून, केंद्र सरकारच्या योजनाशंभर टक्के कार्यान्वित करताना स्थानिक गरजांनुसार नवीन उपक्रमही राबवले आहेत. यामध्ये राज्यातल्या १५ सरपंचांचा समावेश आहे. या सर्व सरपंचांचा आज दिल्लीत पंचायत राज मंत्रालयाकडून सन्मान करण्यात येणार आहे. या वर्षीच्या या

कार्यक्रमाचं घोषवाक्य ‘आत्मनिर्भर पंचायत, विकसित भारताची ओळख’ अशी असून, यावेळी सभासार ॲपचं उद्घाटन करण्यात येणार आहे.राज्यातला मुख्य शासकीय सोहळा मुंबईत मंत्रालयात होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात ध्वजारोहण होणार आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७९वा राष्ट्रध्वजारोहण समारंभ शुक्रवारी १५ ऑगस्ट रोजी मनपा मुख्यालयातील हिरवळीवर सकाळी ८ वाजून ०५ मिनिटांनी आयोजित केला आहे. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजारोहण होणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांच्या मुख्यालय स्थळी सकाळी 9 वाजून 05 मिनिटांनी मंत्री, पालकमंत्री, सहपालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. नागपुरचा मुख्य शासकीय  ध्वजारोहण समारंभ महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री डॉ. अशोक ऊईके यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. भंडारा येथील पोलीस कवायत मैदानावर वस्त्रोद्योग मंत्री तथा पालकमंत्री संजय सावकारे  यांच्या हस्ते तर गोंदिया येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. गडचिरोली  येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात वित्त व नियोजन राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्या हस्ते तर वर्धा येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

‘हर घर तिरंगा’

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात हर घर तिरंगा अभियान उत्साहात राबवण्यात येत आहे. वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात भव्य तिरंगा रॅली आणि मानव साखळीचे आयोजन करण्यात आले. यवतमाळ च्या कळंब आणि राळेगाव इथं राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेत सहभागी नागरिकांनी हाती तिरंगा ध्वज घेऊन भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा दिल्या तर महिलांनी फेटे परिधान करून यात्रेत सहभाग नोंदविला. "तिरंगा" आपला अभिमान आहे, जो भारतीयांना एका मजबूत बंधनात बांधतो. देशाच्या संरक्षणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव च्या माध्यमातून भारतावर वक्रदृष्टी ठेवणाऱ्यांना कणखर उत्तर दिल्याचे यावेळी मंत्री अशोक उईके यांनी सांगितले.

जम्मू-काश्मीर

जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी या याचिकेला

विरोध दर्शवल्यानंतर, सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के.विनोद चंद्रन यांच्या पीठानं जम्मू-काश्मीरमधल्या सद्यस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असं सांगून पहलगाम दहशतवादी हल्ल्यांकडे लक्ष वेधलं. या मुद्द्यावर काम करण्यासाठी आठ आठवड्यांचा अवधी द्यावा, अशी मागणी सॉलिसिटर जनरल मेहता यांनी केली. यावर, आठ आठवड्यांनंतर लगेचच उत्तर दाखल करायचे निर्देशही सरन्यायाधिशांनी दिले.

विभाजन विभिषिका दिवस

विभाजन विभिषिका दिवसआज पाळला जात आहे. स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर देशाची झालेली फाळणी आणि त्यावेळेस झालेल्या भीषण संहाराच्या स्मृत्यर्थ हा दिवस पाळला जातो। या अनुषंगाने देशभरात आज फाळणीच्या आठवणी दाखवणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनांसह विविध उपक्रमांचं राबवण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त सामाजिक माध्यमावरच्या संदेशात, फाळणीच्या काळात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या लाखो निरपराध नागरिकांना, शूर वीरांना आणि बेघर झालेल्या असंख्य कुटुंबांना आदरांजली अर्पण केली.

एचएसआरपी

वाहनाला उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट अर्थात एचएसआरपी लावण्यासाठी नागपूर महानगरात तब्बल 114 केंद्र सुरु असून आजवर 40 टक्के नोंदणी प्रक्रीया पूर्ण झाली असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण बिडकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. राष्ट्रीयसुरक्षा, वाहन चोरी, रस्त्यावरून धावणा-या वाहनांची ओळख पटविण्यासाठी तसेच वाहना संबंधित गुन्हयावर नियंत्रण आणण्यासाठी ही नंबर प्लेट बसविणे गरजेचे आहे. सर्व वाहनधारकांनी https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन बुकींग प्रक्रीया पूर्ण करावी व दिलेल्या अपॉइंटमेंटनुसार वाहनाला एच.एस.आर.पी. प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकान्वये करण्यात आले आहे.

वोट चोरी

राजकीय व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वोट चोरी या शब्दावर केंद्रीय निवडणूक आयोगानं आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारचे शब्द भारतीय मतदारांच्या प्रतिष्ठेवर आणि आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या प्रामाणिकपणावर आघात केल्यासारखे असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. एक व्यक्ती एक मत हे तत्त्व पहिल्या निवडणुकीपासून लागू असून बोगस मतदानाच्या तक्रारी पुराव्यानिशी सादर केल्या पाहिजेत. एका व्यक्तीने दोनदा मतदान केल्याचा पुरावा असल्यास तो आयोगाकडे सादर करावा, असंही आयोगाने म्हटलं आहे.

हवामान

येत्या काही तासात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.याशिवाय वाशीम, यवतमाळ जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे असा अंदाज नागपूरच्या प्रादेशीक हवामान केंद्राने वर्तवला आहे.

******